
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - IX, Issue - III
July - September - 2020
Marathi Part - I / II

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | सुखाचा खरा मार्ग: पंचशील<br>**नंदकुमार शामराव उबाळे** | १-८ |
| २ | आदिवासी महिला सरपंचाच्या अडचणीचे अध्ययन<br>**प्रा. राखी इंगळे**<br>**डॉ. पुरूषोत्तम थोटे** | ९-१३ |
| ३ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>**प्रा. डॉ. दुधाने प्रल्हाद दत्तात्रय** | १४-१९ |
| ४ | भारतातील शाश्वत विकास आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सामूदायिक भूमिकेची गरज<br>**प्रा. डॉ. कांतराव प्र. पोले** | २०-२४ |
| ५ | मराठा समाजाला आरक्षण ही काळाची गरज : एक चिकित्सा<br>**प्रा. डॉ. संजीव कोळपे** | २५-३० |
| ६ | राजकीय पक्षातील अनुसूचित जातींचे स्थान<br>**डॉ. गजानन जी. हिवराळे** | ३१-३५ |
| ७ | अभिजात संगीत<br>**डॉ. संजय मोहड** | ३६-३९ |
| ८ | ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायस्थे स्वरुप व वैशिष्ट्ये<br>**संजय जनार्दन आगलावे** | ४०-४३ |
| ९ | कौटुंबिक हिंसाचार कारणे आणि उपाययोजना<br>**सुमंगला सुंदरराव शिंदे** | ४४-४७ |
| १० | पुणे जिल्हयाच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान : समाजशास्त्रीय अभ्यास<br>**राजकुमार मुकुंदराव गांधले** | ४८-५१ |
| ११ | अण्णा भाऊ साठे : जीवन आणि कार्य<br>**प्रा. डॉ. वैशाली बाबुराव कोटंबे** | ५२-५६ |

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

MARATHI PART - I / II

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING

2019 - 6.399

www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan

Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ५. मराठा समाजाला आरक्षण ही काळाची गरज : एक चिकित्सा

प्रा. डॉ. संजीव कोळपे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड.

## प्रस्तावना

आरक्षण म्हणजे संधीची सवलत. जीवनात काही जातीना विकासाची संधी मिळावी यासाठी देण्यात आलेली सवलत म्हणजे आरक्षण होय. आपल्या समाजात काही जाती विकासाचा सहज लाभ घेण्याएवढ्या सक्षम तर काही सक्षम नाहीत. म्हणूनच समाजातल्या सर्वच गटात विकासाची समान संधी असावी, पण दुबळ्या गटाच्या विकासासाठी विशेष संधी असावी ही व्यवस्था घटनात्मक पद्धतीने आम्ही मान्य केली आहे. याच व्यवस्थेला आपण 'आरक्षण व्यवस्था' या नावाने ओळखतो. म्हणून समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाच्या संदर्भात अनुकूल असा विचार करुन विशेष सवलती दिल्या जातात. जुन्या काळात ही आरक्षण व्यवस्था होतीच, पण व्यक्तीस व्यवसायाचे स्वातंत्र्य नव्हते. आरक्षण व्यवस्थेत जुन्या काळी विषमतेच्या संदर्भात जातीना जन्माने अधिकार मिळत. आज सामाजिक न्यायाच्या संदर्भात जातीना जन्माने काही अधिकार मिळावेत, अशी मांडणी करीत आहोत. तेव्हा खरा प्रश्न हा सामाजिक न्याय आपण मान्य करावा की करु नये हा आहे.

आमच्या परंपरेने प्रत्येक जातीला त्यानी कोणते उद्योग करावेत याचे आरक्षण दिलेले होते आणि या आरक्षणाला जन्माचा आधार जोडला होता. त्यामुळे जोपर्यंत प्रत्येक व्यक्तीस व्यावसायाचे स्वातंत्र्य नव्हते तो पर्यंत परंपरेने चालत आलेली ही व्यवस्था आम्हाला कधीच त्याज्य वाटलेली नव्हती. म्हणून खरा प्रश्न आरक्षण व्यवस्था मान्य करणे अथवा अमान्य करणे हा नाहीच. खरी अडचण इथून सुरु होते की कुणबी, सुतार, लोहार या जातीचे लोक आम्हाला सुद्धा कारकून, तहसीलदार होण्याचा हक्क आहे असे सांगतात तेव्हा आम्ही हा त्यांचा हक्क मान्य करावा की करु नये? एकदा तुम्ही हा हक्क द्यायचा मान्य केले की, त्याना आपला हक्क उपभोगता येईल एवढे सक्षम करणे ही आमची जबाबदारी ठरते. काही जातीना अशा व्यवस्थेत पोचेपर्यंत विशेष सवलत द्यावी लागते. म्हणजे आरक्षण व्यवस्था ही मूलतः व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क आपण मान्य केला आहे इथे उगम पावते आणि सामाजिक न्यायाच्या नैतिक शिकवणुकीच्या आधारे पक्की होते. आरक्षण व्यवस्थेला अंतर्विरोध का निर्माण झाला? तेव्हा मुळात आपण जन्माने इतरापेक्षा श्रेष्ठ आहोत ही समजुत जोपर्यंत नष्ट होत नाही, तोपर्यंत आरक्षण व्यवस्था आपणाला न्याय वाटणे शक्य नाही.

## शोध निबंधाचा उद्देश

1. आरक्षण म्हणजे काय? याचा शोध घेणे.
2. आरक्षणाचा इतिहास तपासणे
3. मराठ्याचा इतिहास तपासणे
4. मराठा समाजाला आरक्षण का द्यावे याचा शोध घेणे

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, दैनिक वर्तमानपत्र व इंटरनेट सुविधा इत्यादी साधनांचा आधार घेतला आहे.

**आरक्षण काय आहे**

आरक्षण म्हणजे नेमकं काय आहे? ते कोणला मिळत? का मिळत? हे पाहणे गरजेच आहे. भारत स्वतंत्र झाला तेंव्हा इथल्या समाजाचा सर्वांगीन विकास व्हावा यासाठी संविधानात 'वेलफेअर स्टेट' च्या तरतूदी घालण्यात आल्या. त्यातील पिढीतांना प्रतिनिधित्व देणारी तरतूद म्हणजे आरक्षण होय. आता प्रश्न असा येतो की मराठे ज्यांना मागासपणाचे डोहाळे लागले ते या निकषात बसतात का? जर यांना त्यात बसवायचे झाल्यास हे सिद्ध करावं लागेल की, यांना सामाजिक स्तरावर प्रतिनिधीत्व नाकारल गेलं होतं. पण यांना गरिबीच्या निकषावर आरक्षण देण्यात यावे गरिबीच्या निकषावर आरक्षण देण्याची तरतूद आपल्या संविधानात नाही. मग यांना आरक्षण द्यायचे झाल्यास एकमेव उपाय म्हणजे भारतीय संविधानात तशी अमेंडमेंट करावी लागेल. म्हणजे आर्टिकल 15 मध्ये सबक्लॉज 6 घालून किंवा आहे त्यात नवीन वाक्य घुसडून गरिबीच्या निकषावर आरक्षण देण्याची तरतूद करावी लागेल. आर्टिकल 16 मध्येंही हीच प्रोसेस करुन नोकरीतील आरक्षण अमेंडमेंट करावे लागेल.

सध्या महाराष्ट्रात 52 टक्के आरक्षण आहे. त्यात 13 टक्के अनुसूचित जाती, 7 टक्के अनुसूचित जमाती, 11 टक्के भटके विमुक्त, 2 टक्के विशेष मागासवर्ग तर 19 टक्के इतर मागासवर्ग अशी आरक्षणाची टक्केवारी आहे. मराठा समाजाच्या मागणीनुसार आरक्षणाची मर्यादा 52 टक्के वरुन 85 टक्के करावी, लोकसंख्येच्या प्रमाणात मराठा समाजाला 35 टक्के राखीव जागा द्याव्यात. मराठा–कुणबी हा भेद नष्ट व्हावा यासाठी ओबीसी प्रवर्गाची सरकारने जाहीर केलेल्या 13 ऑक्टोबर 1967 पूर्वीची जमीन, घर, स्थावर मालमत्तेच्या खरेदीखत यांच्या नोंदी विचारात घ्याव्यात. मराठवाड्यात राष्ट्रीय नोंदणी रजिस्टरवरील जातीच्या तर विदर्भात कोतवाल पुस्तक, खासरा पत्रकावरील जन्ममृत्यूच्या नोंदी ग्राह्य मानाव्यात.

**आरक्षण अंमलबजावणीसाठी आर्थिक निकष**

राज्यांना इ.स. 1961 मध्ये या अहवालाच्या आधारे निर्णयाचे स्वातंत्र्य दिले. त्याप्रमाणे भारतातील विविध राज्यांनी आपापल्या पद्धतीने सवलती जाहीर केल्या महाराष्ट्रापुरते बोलायचे तर 13 टक्के अनुसूचित जाती, 7 टक्के अनुसूचित जमाती, 4 टक्के विमुक्त भटके अशा 24 टक्के सवलती होत्या. त्यात ओबीसींना 10 टक्के सवलती दिल्या. ओबीसीमध्ये महाराष्ट्र राज्यानेदेखील अखेर काही जातींचीच नोंद केली. ही घटना 1964 सालची म्हणजे मंडल आयोगाच्या नियुक्तीपूर्वीची आहे. जातवार सवलतीच्या संदर्भात आपली घटनादुरुस्ती (कलम 5 मधील 4 क्रमांकाचा क्लॉज) 1951 साली झाली. त्यावेळी भारताचे सरन्यायाधीश **जस्टीस सुब्बाराव** होते. त्यांनी हे कलम 'आहे रे' आणि 'नाही रे' यांच्यातील तोल सांभाळणारे चाक आहे अशी मल्लीनाथी केली. याचाच अर्थ देशाच्या सरन्यायाधीशानाही सवलती जातीनिहाय असणे नैतिकदृष्ट्या आवश्यक वाटते. हा इतिहास एवढ्यासाठी नोंदवला, की मागासवर्ग ठरवताना प्रत्यक्ष व्यवहारात मागास जाती असाच निष्कर्ष नेहमी आला आहे. तेव्हा मंडल आयोग हा पहिला आयोग नव्हे, ज्यांनी मागासवर्ग म्हणजे काही 'मागास जाती' असा निर्णय घेतला. आयोग राबवण्याच्या बाबतीत मात्र **काका कालेलकर** ह्यांचा स्वतःचाच विरोध होता, त्याचे कारण त्यावेळची परिस्थिती त्यांना गैरसोयीची वाटत होती, **काका**

**कालेलकर** म्हणतात: Evils of Caste could be removed by measures which could be considered in terms of caste alone. जाती हा आधार घेतला तर जातीयवाद वाढेल, ही भीती व्यक्त करणाऱ्या मंडळींनी इकडे लक्ष देणे आवश्यक आहे, की मागासवर्ग ठरवताना निष्कर्ष म्हणून काही जातीचीच नावे पुढे का येत आहेत?

मंडल आयोगास विरोध करणाऱ्या तरुणानी आर्थिक कसोटीचा आग्रह धरणे स्वाभाविक आहे. सुशिक्षित बेकारांची संख्या उपलब्ध नोकऱ्यांच्या तुलनेत जास्त आहे. मंडल आयोगाने वगळलेल्या जातीतील तरुण मोठ्या संख्येने आहेत. मंडल आयोगाच्या समर्थकांनीही तरुणांचा संताप समजून घेतले पाहिजे. मंडल आयोग विकृत स्पष्टीकरणांसह सांगणाऱ्यांबद्दल मंडल आयोगाने कोणत्या कसोट्यांचा वापर केला हे समजून घेण्यापूर्वी आमच्या समाजाचे स्वरुप आम्ही नीट समजून घ्यावे. केवळ आर्थिक कसोटी वापरणे सामाजिक न्यायाच्या तत्वाला सुसंगत नाही. म्हणूनच काका कालेलकरापासून ते मंडल आयोगापर्यंत मागासवर्गीय म्हणजे कोण यासाठी आणखी काही कसोट्यांचा वापर केल्यामुळे मागास जाती या निर्णयापर्यंत सगळेच पोचतात. मागासवर्गाच्या संदर्भात आर्थिकखेरीज जातीचा विचार मात्र प्रत्यक्ष मध्यमवर्गीयांच्या हितसंबंधावर घाला घालणारा असल्यामुळे तो अधिक जाचक वाटतो. अधूनमधून काही जाती/जमाती संघटित होऊन आपला समावेश अनुसूचित जाती/जमातींमध्ये करावा अशी मागणी करतात. अशा स्वरुपाची मागणी आणखी काही वर्षानंतर याही दुर्बल जातींकडून होणार हे निश्चित, म्हणूनच उद्याची भीषण जातीय तेढ टाळण्यासाठी आज आर्थिक निकषाखेरीज अन्य निकषाचा विचार करणे आवश्यक आहे.

**मराठ्यांच शोषण कोणाकडून ?**

मराठा जातीतील बेरोजगारी, दारिद्र्या, शेतकरी आत्महात्त्या, शैक्षणिक अडचणी आणि त्यामधून येणारी वैफल्याची भावना, अस्वस्थता समजून घेता येते. राणे समितीच्या अहवालानुसार साडेबारा लाख मराठा कुटुंब दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत. मराठा जातीमधील शैक्षणिक अवस्थेचा कोणताही अधिकृत अहवाल उपलब्ध नाही. परंतु राणे समितीला मराठा सेवा संघाचे **पुरुषोत्तम खेडेकर** यांनी दिलेल्या निवेदनानुसार, 80 टक्के स्त्री–पुरुष दहावीपर्यंतही शिकू शकले नाहीत. 2 टक्के महिला व 6 टक्के पुरुषांना सगणक वापरता येते. पदवीधर स्त्रियांचे प्रमाण 6 टक्के तर पुरुषांचे 10 टक्के, मेडिकल, इंजिनियरिंग यामध्ये 3 टक्क्यांच्या आसपास प्रमाण आहे. पण याची कारणे सरकारांची विकास धोरणे, दृष्टीकोन यामध्ये आहेत? विरोधाभास असा की, मराठा जातीच्या इतक्या शैक्षणिक समस्या असताना, राज्यातील 70 ते 80 टक्के प्राथमिकपासून उच्च शिक्षण देणाऱ्या सस्था या मराठा नेत्यांच्या आहेत. **सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यावसायिक उच्च शिक्षण संस्थांमध्ये व्यवस्थापनाला 15 टक्के जागा भरण्याची** मुभा आहे. आरक्षणाची कुठलीही अट नाही. परंतु संस्थाचालकांनी गरीब, गुणवंत मराठा मुलांना संस्थांमध्ये सवलतीने प्रवेश उपलब्ध करुन दिल्याचे ऐकिवात नाही. मराठा जातीचा प्रश्न अर्थ–वर्गीय आणि तो सोडवण्याचा अजेंडा मात्र जातअस्मिताआधारित, असे कसे असू शकते?

**मराठ्यांचा अस्तित्वशोधाचा लढा**

महाराष्ट्रात लोकसंख्येच्या जवळपास एकतृतीयांश असलेला मराठा समाज, हा काही एकसंघ समुदाय नाही. ऐतिहासिक दृष्ट्या तो कुणबी या शेतकरी जातीतून उत्क्रांत झाला आहे. पण मध्ययुगीन काळात सैन्यात जाणाऱ्या या जातीने स्वत:साठी योद्धा म्हणूनची एक स्वतंत्र ओळख गृहीत धरायला सुरुवात केली. याशिवाय ते 96 कुळी

वंशजाच्या उतरंडीचा दावाही करतात पण खरा भेद हा जातीच्या आत वर्ग निर्माण होण्याच्या स्वातंत्र्योत्तर विकासप्रक्रियेतून आला आहे. एक वर्ग हा उच्चभ्रूंचा लहान पण शक्तिशाली, म्हणजे गढीवरचा मराठा होय. दुसरा वर्ग हा वाड्यावरचा मराठा होय. आणि मराठ्यांच्या उर्वरित वर्गामध्ये लहान शेतकरी असून, त्यांना वाडीवरचा मराठा म्हणतात.

मराठा समाज सत्ताधारी, राज्यकर्ता असा समज आहे. प्रत्यक्षात काही व्यक्ती राज्यकर्ते होते, संपूर्ण समाज कधीही राज्यकर्ता नव्हता. व्यक्ती आणि समाज यामध्ये आपण गल्लत करतो. मराठा समाजासंदर्भातली प्रत्येक चर्चा राजकीय सत्तेच्या वर्चस्वापासून तसंच आर्थिक हितसंबंधांपासूनही होते. अर्थात सहकार, शिक्षण अशी विविध क्षेत्रातली आर्थिक नियंत्रणाची चर्चा संख्यात्मक स्वरुपाची असते. राजकीय व आर्थिक सत्तेचा संबंध सर्वसामान्यांचे हितसंबंध जपण्यासाठी झाला का? तसंच अर्धवेळ शेती, मजुरी किंवा भूमिहीन लोकांच्या कल्याणासाठी झाला का? या चौकटीमधून चर्चा घडत नव्हती. प्रथम व्यापक पातळीवर या प्रश्नाला तोंड फुटल! मराठा समाजात 1990 च्या दशकापासून आर्थिक चौकटीमध्ये विसंगती उदयाला आल्या आणि त्याचाच परिणाम म्हणून मराठा समाज स्वत:च स्थान आणि अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न **'मराठा क्रांती मोर्चा'** च्या माध्यमातून करत आहे. मराठ्यांच्या संदर्भात नव्या युगाची ही सुरवात सर्वव्यापक व दूरगामी अशी दिसते. त्यांच्या वेदना फार तीव्र आहेत. मराठा जातीअंतर्गत स्तरीकरण झालं आहे.

**मराठा समाजाला आरक्षण का हवे?**

मराठा आरक्षणाची मागणी सुमारे 1997 पासून केली जाते. निवृत्त न्यायाधीश **आर.एम.बापट** यांच्या अध्यक्षतेखालील सरकारनियुक्त समितीने, जुलै 2008 च्या अहवालात इतर मागासवर्गीयांमध्ये मराठ्यांचा समावेश करण्याची मागणी मंजूर केली नव्हती. हा अहवाल नाकारण्या किंवा स्वीकारण्याआधी सरकारने निवृत्त न्यायमूर्ती **बी.पी. सराफ** यांच्या अध्यक्षतेखाली एक नवीन समिती नेमली. पण कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेस सरकारने मंत्री **नारायण राणे** यांच्या नेतृत्त्वाखाली आणखी एक विशेष समिती स्थापन केली. आणि अपेक्षेप्रमाणे राणेंनी 16 टक्के मराठा आरक्षणाची शिफारस यात केली. पण दुर्दैवाने जनहित याचिकेमुळे मुंबई उच्च न्यायालयाने हा अध्यादेश स्थगित केला. कारण राज्यातील एकूण आरक्षण 73 टक्क्यांपर्यंत म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेली मर्यादा ओलांडून पलीकडे जाणार होते. या तांत्रिक बाबीव्यतिरिक्त, मराठ्यांचा मुख्य मुद्दा हा आहे की त्यांच्यातील बहुसंख्य लोक मागास, लहान जमीनदार आहेत. मुख्यमंत्री **विलासराव देशमुखांनी** मराठा समन्वय समितीच्या नेत्यांना न्यायमूर्ती **बापट** अहवालावर विधी व न्याय विभागाचे मत घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मराठा आणि कुणबी या दोन जाती नसून विदर्भ आणि कोकणात त्यांच्यात फारसा फरक नसल्याची भूमिका मांडून ओबीसीत समावेश करुन मराठा समाजास शिक्षण आणि नोकऱ्यात 25 टक्के आरक्षण द्यावे, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असे मराठा समाजाच्या संघटनांनी रोखठोक भूमिका घेतली होती.

**मराठा आरक्षण काळाची गरज**

1902 साली छत्रपती शाहू महाराजांनी जगातील पहिले मागासवर्गीयांसाठी आरक्षण घोषित केले, त्यामध्ये मराठा समाजाचाही समावेश होता. 1931 साली ब्रिटिश काळात मराठा समाजाची जनगणना झाली. त्यामध्ये 27 टक्के मराठा होता, तर 2 टक्के कुणब्यांची नोंद झाली. वऱ्हाडात आणि विदर्भात कुणब्यांचे स्थान दुय्यम मानले जायचे

मानासाठी कुणब्यांना अनेक वेळा संघर्ष करावा लागला. स्वातंत्र्यापूर्वी 1931 च्या ब्रिटिश सर्व्हेप्रमाणे जवळपास 65 टक्के जमिनी मराठा व कुणबी समाजाकडे होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठा समाज सुखी आणि समृद्ध होता. स्वातंत्र्यानंतर मराठा समाजाला सत्तास्थाने मिळू लागली. परंतु आजोबाच्या मालकीची 100 एकर जमीन 50 वर्षांच्या पाचव्या पिढीत नातू 5 ते 4 एकराचा अल्पभूधारक झाला.

राज्यघटनेमध्ये **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी** 340 व्या कलमामध्ये असे म्हटले आहे की, "भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिक मागासलेल्या वर्गासाठी आयोग नेमणे". 1953 मध्ये **डॉ.पंजाबराव देशमुख** व **विठ्ठलभाई पटेल** यांच्या मागणीवरुन **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी** तात्कालीन प्रधानमंत्री **पंडित जवाहरलाल नेहरुंना** पत्र लिहिले. त्यात 340 व्या कलमान्वये आयोग नेमण्याची मागणी केली. **'काका कालेलकर आयोग'** हा असे सांगतो की, देशातील 85 टक्के लोकांना धर्माने हक्क, अधिकार नाकारले. या आयोगाने मराठा समाजाला 'मराठा' म्हणून आरक्षणाचा लाभ दिलेला आहे. 1953 पासून मराठ्यांना आरक्षणाची तरतूद आहे. आणि ही तरतूद 'मराठा' म्हणून आहे. भारतीय राज्यघटनेने आरक्षण हे आर्थिक निकषावर न ठेवता ते सामाजिक पायावर दिले आहे. हे करीत असताना 340 कलमाने मागासलेल्या विभागांचा अभ्यास करुन त्यांचे मागासलेपण घालवण्यासाठी आयोग नेमण्याची तरतूदही करुन ठेवली.

सुप्रसिद्ध पत्रकार **पी.साईनाथ** यांनी महाराष्ट्राला 'शेतकऱ्यांचे कब्रस्तान' म्हटले आहे. महाराष्ट्रातील मराठा समाजातील 60 टक्के शेतकरी अल्पभूधारक असून ते दारिद्र्यरेषेखाली जीवन जगतात. आज त्यांच्या दयनीय अवस्थेला शेतकरी असण्याबरोबर कुणबी–मराठा जातीत जन्माला येणे हेही कारण आहे. सर्व मराठ्यांची जात 'कुणबी' हीच आहे हे ऐतिहासिक आणि नोंदीकृत पुराव्यांच्या आधारे सिद्ध करुन ओबीसी म्हणून आरक्षण देण्यास कोणतीच अडचण येत नाही (1981 च्या जनगणनेनुसार 1984 साली प्रसिद्ध झालेले गॅझेट). 1911 सालच्या आकडेवारीनुसार जमीनदार असलेले मराठा (कुणबी) फक्त 1.7 टक्के होते. स्वतःराबून शेती करणारे 63.8 टक्के होते. शेतमजुरी करणारे 22.7 टक्के होते.

मराठा समाजाचे आर्थिक, सामाजिक प्राबल्य होते ते आता कमी झाले आहे. गेल्या 30 वर्षात मोठी आर्थिक अधोगती झाली आहे. 1961 पासून आरक्षण सुरु झालं असलं तरी **व्ही.पी. सिंग** यांच्या आशीर्वादाने 1994 सालात मोठ्या प्रमाणात मंडल आयोगाने आधार दिला. आरक्षणाने दुबळा माणूस विकसित झाला. मराठ्यांना आरक्षण मिळावे ही आग्रहाची मागणी आहे. चातुर्वण्य, ब्रिटिशांनी कुणबी आणि मराठा एकत्र दाखवले होते. कुणब्यांबरोबर मराठा शुद्र होते, असा आधार देऊन आरक्षण मागण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्य सरकारने चार वर्षानंतर म्हणजे जानेवारी 2007 मध्ये मराठा समाज आरक्षणाच्या दृष्टीने मागासवर्गीयांमध्ये मोडतो का नाही, याचा फैसला करण्यासाठी निवृत्त न्या. **एस.बी.म्हसे** यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली होती.

**निष्कर्ष**

मराठा समाजाची आरक्षणाची मागणी रास्त आहे. मराठा जातीअंतर्गत स्तरीकरण झाल आहे. त्यापैकी तळागाळातला वर्ग हा पिचलेला आहे. त्या वर्गातून प्रथमच लोक असंतोष व्यक्त करत आहेत. आर्थिकदृष्ट्या मागास मराठ्यांच्या उद्धारासाठी आरक्षण आवश्यक आहे. शिक्षणात मराठा समाजाचे मोठे सामाजिक नुकसान झाले व आर्थिक

विकासाकडेही कमालीचे दुर्लक्ष झाले. मराठा समाजाला त्याच्या संख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे. मराठा समाजाच्या मुलांकरिता सवलती, शिक्षण–नोकरी यामध्ये आरक्षण देणे आवश्यक आहे

संदर्भग्रंथ


1. मंडल आयोग : गैरसमज आणि आक्षेप : दत्ता भगत
2. मराठा आंदोलन असंतोष आणि बहुजनवादी चळवळीची दिशा : प्रताप आसबे
3. सकाळ शब्ददीप आक्टोबर, 2016
4. मुक्त शब्द मासिक नोव्हेंबर–डिसेंबर, 2016
5. पुण्य नगरी प्रवाह (12,19) मार्च 2017
6. marathareservations.blogspot.com
7. mdramteke.blogspot.com
8. marathi.webdunia.com